# जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद
**अदालत रोड, औरंगाबाद 431 001.**

## <u>निविदा सुचना</u>

मा.जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद, दिवाणी न्यायालय व.स्तर, औरंगाबाद व मुख्य न्यायादंडाधिकारी, औरगाबाद यांचे आस्थापनेवरील न्यायालये व कार्यालये येथील 70 डेझर्ट कुलर्सच्या देखभाल व दुरुस्ती करिता खालील अटी व शर्तीना अधिन राहुन निविदा मागविण्यात येत आहेत.

1.डेझर्ट कुलर्सची दुरुस्ती ही जिल्हा न्यायालय येथे येवून करण्यात यावी.

2.डेझर्ट कुलर्सचे वाळे बदलण्यात यावेत व वाळे बदलतांना तुटलेल्या जाळ्या निदर्शनास आल्यास त्या बदलण्यात याव्यात व त्यास रंग देण्यात यावे.

3.डेझर्ट कुलर्सला गळती होत असेल ती बंद करणे.

4.डेझर्ट कुलर्सच्या खाली पाणी साठविण्या करिता असलेल्या ट्रे मधून पाण्याची गळती होत असल्यास ती थांबविणे.

निविदाकार हे एका डेझर्ट कुलर्सची पाहणी कार्यालयीन वेळेत जिल्हा व सत्र न्यायालय, लेखा व वित्त विभाग येथे येवून पाहणी करु शकतात

उपरोक्त अटी व शर्तीना अधिन राहून निविदाकार हे डेझर्ट कुलर्सच्या दुरुस्तीचे दर (जीएसटी सह) नमुद करुन मोहरबंद निविदा/दरपत्रके दिनांक 08/04/2024 ते दिनांक 12/04/2024 या कालावधीत सादर करतील.

सदर मोहरबंद निविदा /दरपत्रके दिनांक 12/04/2024 रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत म्हणजेच 6:00 वाजेपर्यंत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय,लेखा व वित्त विभाग, औरंगाबाद या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रकांचा या प्रकियेत समावेश करण्यात येणार नाही.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवत आहे.

आदेशावरुन
Agapale 08/04/2024
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
औरंगाबाद

दिनांक :– 08/04/2024

<u>टिप</u> :–

01) निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सादर करतांना त्यावर जीएसटी क्रमांक नमुद असलेले तथापी, जीएसटी क्रमांक लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.
02) निविदाकारांनी निविदा/दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक असेल.
03) प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा/दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
04) खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि ईच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकारांना श्हमीपत्रश सादर करावे लागेल.
05) निविदा मान्य करणेबाबतचे अंतिम अधिकार हे निविदा समितीकडे आहेत.